Scan QR code to visit... Epaper Portal

www.sahyandrinews.com

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १०७ • Title - Code :- MAHMAR49513 • गुरुवार दि.११ जानेवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# खरी शिवसेना एकनाथ शिंदेंचीच

## शिंदेंची सेना जिंकली! १६ बंडखोर आमदार ठरले पात्र; मुख्यमंत्रीपदही वाचलं

**मुंबई – गेल्या दीड वर्षापासून प्रलंबित असलेल्या महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षाचा मोठा निकाल समोर आला असून शिवसेनेच्या दोन्ही गटातील कोणताही आमदार अपात्र ठरलेला नाही.विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी समतोल निर्णय घेत शिंदे गट आणि ठाकरे गटाच्या आमदारांना अपात्र ठरवलेलं नाही. मात्र त्याचवेळी शिंदेंचीच शिवसेना ही खरी शिवसेना असल्याचा निकालही त्यांनी दिला.**

एकनाथ शिंदे यांनी बंड केल्यानंतर त्यांनी ठाकरेंपासून वेगळा सवतासुभा मांडत भाजपशी घरोबा केला आणि सत्ता स्थापन केली. त्यानंतर शिंदे यांनी शिवसेना पक्ष आणि चिन्हावर दावा केला. नंतर निवडणूक आयोगाने हा त्यांच्या बाजूने निर्णय घेत त्यांचा हा दावा योग्य ठरवला. या दरम्यान ठाकरे गटाच्या वतीनं शिंदे गटाच्या १६ आमदारांच्या विरोधात पक्षांतरबंदी कायद्यान्वये याचिका दाखल केली. त्याचवेळी शिंदे गटाच्या वतीनंही ठाकरे गटातील १४ आमदारांच्या विरोधात याचिका दाखल केली होती. या दोन्ही गटाच्या अपात्रतेच्या याचिका राहुल नार्वेकरांनी फेटाळल्या आहेत. त्यामुळे कोणताही आमदार अपात्र ठरलेला नाही.त्या आधी शिवसेना कुणाची यावर निर्णय देताना राहुल नार्वेकरांनी उद्धव ठाकरेंना मोठा धक्का दिला.बहुमताच्या आधारावर शिवसेना ही शिंदेंचीच असल्याचं ते म्हणाले. राहुल नार्वेकर म्हणाले की, २१ जून २०२२ रोजी विधीमंडळ सचिवालयाकडे असलेल्या नोंदीनुसार शिंदे गटाकडे बहुमत दिसत आहे. त्यामुळे शिंदे गट हा त्या दिवशी खरा शिवसेना पक्ष असल्याचे दिसून येते असं महत्वपूर्ण निरीक्षण राहुल नार्वेकरांनी नोंदवलं. तर पक्षप्रमुखाचाच निर्णय अंतिम हा ठाकरे गटाचा दावा फेटाळण्यात आला आहे. शिवसेना पक्षप्रमुख गटनेत्याला पदावरून हटवू शकत नाहीत.संपर्काच्या बाहेर गेले, केवळ याच कारणास्तव आमदारांना अपात्र ठरविता येणार नाही. शिवाय, ठाकरे गटाचे मिलिंद नार्वेकर, रविंद्र फाटक यांनी सुरतेत एकनाथ शिंदे यांची भेट घेतली हे ही सिद्ध झाले. सत्तांतराच्या काळात खरा पक्ष हा शिंदेंचा हे सिद्ध झाल्याने २१ जून २०२२ च्या शिवसेना विधिमंडळ पक्षाच्या बैठकीतील गैरहजरीच्या मुद्द्यावर अपात्रता ठरविता येणार नाही असं निरीक्षण राहुल नार्वेकरांनी नोंदवलं.



### घराणेशाही मोडीत निघाली–मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

आजचा निकाल मेरिटनुसारच लागले, आमच्याकडे बहुमत आहे, त्यामुळे निकाल आमच्या बाजूनेच लागेल, असं सूचक विधान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राहुल नार्वेकरांच्या निकालाआधी केलं होतं. एकनाथ शिंदेंनी सुचवल्याप्रमाणे शिंदे गटाच्या बाजूने निकाल लागला आहे. शिंदे गटाचे १६ आमदार पात्र ठरले असून प्रतोद भरत गोगावले यांचा व्हीपही वैध ठरवण्यात आला आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या निकालानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एबीपी माझाला प्रतिक्रिया दिली.एकनाथ शिंदे म्हणाले, लोकशाहीत बहुमताला महत्त्व असतं. बहुमत आमच्याकडे आहे. विधानसभेचंही आणि लोकसभेचंही. निवडणूक आयोगाने खरी शिवसेना आम्ही असल्याचं मान्य केलंय. एकाधिकारशाही आणि घराणेशाही मोडीत निघाल्याचं आजच्या निकालावरून दिसतंय.

# गोंडपिपरीत महिला मंडळ अधिकाऱ्याची धडक कारवाई

## गौण खनिजाची अवैध वाहतूक करताना चार ट्रॅक्टर जप्त

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

गोंडपिपरी तालुक्यात गेल्या काही दिवसात अवैद्य उत्खनन मोठ्या प्रमाणात सुरू होते.त्यानंतर एका रेती घाटावर सरपंच व तंटामुक्ती समितीच्या अध्यक्षा वर झालेल्या हल्ल्यामुळे तालुका हा चर्चेत आला होता मोठ्या प्रमाणात महसूल विभागावार ताशेरे ओढण्यात आले होते.नव्यानेच रुजू झालेल्या मंडळ अधिकारी सुकेशनी कांबळे यांच्या धडक कारवाईने अवैध गौण खनिज तस्करी करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

मागील आठवड्यात रेती तस्करांचा सरपंचावर हल्ला केल्याने एकच खडबड उडाली होती .त्यानंतर रेती तस्करांच्या मुसक्या आवळाव्या अशी मागणी जोर धरू लागली.त्यानंतर महसूल विभाग क्टिव झाले




आणि फिरते पथक गठित करून रेती तस्करीला लगाम लावला. वरोरा येथून गोंडपिंपरी येथे नुकत्याच रुजू झालेल्या मंडळ अधिकारी सुकेशनी कांबळे यांनी गुप्त माहितीच्या आधारावर बोरगाव येथे दि.(९ )मंगळवारी दुपारी ३ वाजता दरम्यान मुरूम मिश्रित माती अवैद्य वाहतूक करताना चार ट्रॅक्टर आढळले असता चौकशी करून उपविभागीय अधिकारी बालाजी शेवाळे ,तहसीलदार शिवाजी कदम यांच्या मार्गदर्शनात ट्रॅक्टर पकडून त्यांच्यावर कारवाई केल्याने एकच खळबळ उडाली आहे.कारवाई दरम्यान तलाठी सुरज राठोड,दिपक झाडे,पूजा बोरकर यांची उपस्थिती होती. मंडळ अधिकाऱ्यांनी केलेल्या धडक कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# कलावाणिज्यच्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरावर भरारी

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

विद्याभारती शिक्षण मंडळ चंद्रपुर द्वारा संचालीत कला - वाणिज्य महाविद्यालय गोंडपिपरीच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांची राज्यस्तरीय आव्हान २०२३ प्रशिक्षण शिबीराकरीता गोंडवाना विद्यापीठाने निवड केली आहे.

गोंडवाना विद्यापीठाद्वारे राज्यस्तरीय आव्हान प्रशिक्षण २०२३ हे दहा दिवसीय शिबीर नुकतेच संपन्न झाले. सदर आपत्ती व्यवस्थापन शिबीरात एन. डी. आर. एफ अधिर्यांकडून स्वयंसेवकांना अपघात, त्सुनामी, भुकंप,आग, पूर अशा नैसर्गिक व मानविय आपत्ती आल्यास स्वतःचा व ईतरांचा बचाव कसा करायचा याचे प्रत्यक्ष धडे प्रशिक्षण शिबीरात विद्यार्थ्यांना देण्यात आले.काजल नागापूरे,दिनेश सोनटक्के,वैभव आदे यांनी प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण केले.त्याबद्दल विद्याभारती शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सुभाषसिंह गौर,संस्थेचे




सचिव प्रा.दिपक गुंठेवार,प्रा.जांभूळकर,प्रा. वसंत चव्हाण,प्रा.पोटवार, प्रा जयंत विरूळकर, रा.से.यो सहकार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. नदकुमार ढवळे यांनी अभिनंदन केले.प्रशिक्षण शिबीरात निवड झालेल्या स्वयंसेवकांना राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.सुनिता खाडे यांचे मार्गदर्शन लाभले.

# तांत्रिक बाबींची पूर्तता करुन फ्लाईंग क्लब फेब्रुवारी अखेर पर्यंत सुरु करा – ना.सुधीर मुनगंटीवार



**मुंबई । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यातील मोरवा विमानतळावर फ्लाईंग क्लब संदर्भात अनुषंगिक कामांच्या सर्व तांत्रिक बाबींची पूर्तता करावी आणि फेब्रुवारी महिना अखेरपर्यंत येथील फ्लाईंग क्लब सुरु होईल, यापद्धतीने नियोजन करण्याचे निर्देश राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिले. यापूर्वी दिनांक २६ जानेवारी रोजी फ्लाईंग क्लब सुरु करण्यासंदर्भांत कार्यवाही अपेक्षित होती. मात्र तांत्रिक कारणांमुळे जरी उशीर होणार असला तरी ही प्रक्रिया तातडीने पुर्ण करुन चंद्रपूरवासियांच्या स्वप्नांची पूर्ती होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.


मंत्री मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली १० जानेवारीला मुंबई येथे चंद्रपूर येथील फ्लाईंग क्लब संदर्भात आढावा बैठक घेण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. महाराष्ट्र विमान प्राधिकरणाच्या उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे, अधीक्षक अभियंता मंगेश कुलकर्णी, दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे नागपूरहून विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी, चंद्रपूरचे प्रभारी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासह महसूल आणि वन विभागाच्या अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.मंत्री मुनगंटीवार म्हणाले की, फ्लाईंग क्लबच्या अनुषंगाने ज्या तांत्रिक बाबींची पूर्तता अद्याप बाकी आहे, त्या अनुषंगाने महाराष्ट्र विमान प्राधिकरण, विभागीय आयुक्तालय, जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद या यंत्रणांनी त्यांना सोपविलेली कामे वेळेत मार्गी लावावीत. भारतीय विमान प्राधिकरणाची ज्या बाबींना परवानगी आवश्यक आहे, ती मिळण्याबाबत तात्काळ पाठपुरावा करावा. तांत्रिक मान्यतेच्या अनुषंगाने ज्या बाबींची पूर्तता करण्याबाबत भारतीय विमान प्राधिकरणाने कळविले आहे, त्या बाबी पूर्ण कराव्यात, अशी सूचनाही त्यांनी केली. मंत्री मुनगंटीवार म्हणाले, नक्षलग्रस्त व आदिवासी जिल्ह्यातील युवक-युवतींना वैमानिक होता यावे, यासाठी चंद्रपूर येथे फ्लाईंग क्लब स्थापन करून विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करण्याचे नियोजन आहे. पहिल्या टप्प्यात १० प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना प्रशिक्षणासाठी किमान तीन शिकाऊ विमाने खरेदी करणे आवश्यक आहे. सीएसआर फंडातून उद्योगपतींकडून अशी शिकाऊ विमाने मिळण्यासंदर्भात कार्यवाही गतीने करण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.

# विधानसभा अध्यक्षांच्या निर्णया विरोधात शिवसेनेची दगडफेक

**पुलगाव । प्रतिनिधी**

संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागलेल्या विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या शिवसेनेच्या अपात्रते विषयीच्या निकालावर पुलगाव येथील उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या शिवसैनिकांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली असून महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसवर तुफान दगडफेक केली. व शिंदे सरकारच्या विरुद्ध घोषणाबाजी केली.

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शिवसेनेच्या दोन्ही गटाद्वारे अपात्रते संबंधी दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर निकाल घोषित केला. सदर निकालाबाबत उबाठा शिवसेना निकालापूर्वीपासूनच प्रतिक्रिया व्यक्त करत होती. त्यामुळे अपेक्षित निकाल न लागल्यास राडा करण्याची त्यांची तयारी होतीच. त्यानुसार शिवसेनेचे जिल्हाप्रमुख यांनी निवडक शिवसैनिकांना सोबत घेऊन महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसवर दगडफेक केली. शिंदे सरकारच्या विरोधात घोषणा दिल्या. हा प्रकार पुलगावच्या स्टेशन चौक परिसरात घडला.



# परमानंद तिराणिक यांना राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्कार मुख्य अव्वर सचिव डॉ.नंदकुमार मंत्रालय मुंबई यांचे हस्ते प्रदान

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य शिक्षक सहकार संघटना चंद्रपूरच्या वतीने राज्यस्तरीय जीवन गौरव विशेष शिक्षक पुरस्कार आनंदवन येथील आनंद अंध विद्यालयातील कला शिक्षक तथा दिव्यांग कल्याण बहुउद्देशीय सामाजिक संस्थाचे चंद्रपूर जिल्हा अध्यक्ष परमानंद तिराणिक यांना डॉ. नंदकुमार राऊत महाराष्ट्र राज्याचे मुख्य अव्वर सचिव , नियोजन विभाग, मंत्रालय मुंबई यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शब्द- शिल्प कविता संग्रह, शिक्षक संघटनेचे विशेषांक व पुष्पगुच्छ देवून सहपत्नीक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

राज्यस्तरीय जीवन गौरव शिक्षक पुरस्कार राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यातील त्यांच्या शैक्षणिक कार्याविषयी दहा शिक्षकांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार वितरण सोहळा जिल्हा मध्यवर्ती बँक मुख्य शाखा -चंद्रपूर येथील माजी मुख्यमंत्री



मा.सा. कन्नमवार सभागृहात संपन्न झाला. या पुरस्कार सोहळ्यात विशेष म्हणजे व्यवस्थेतील महत्वपूर्ण दुर्लक्षित घटक असणाऱ्या अंगणवाडी सेवीका, मदतनीस, शालेय पोषण आहार कर्मचारी, विशेष दिव्यांग शाळेतील शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, शिक्षण क्षेत्राशी निगडीत असलेले स्वयंसेवक या कर्तृत्वान व्यक्तींना पुरस्कार प्रदान करण्यात आला. परमानंद तिराणिक यांनी 'घरोघरी संविधान' वाचन उपक्रम हा एक लाख पोस्टकार्डवर स्वतःच्या हस्ताक्षरात लिहून पोस्टकार्डच्या माध्यमातून पोहचविण्याचा एक आगळा-वेगळा उपक्रम केल्यामुळे ते या पुरस्कारास पात्र ठरले आहे असा नामोउल्लेख करून त्यांची सहचरीणी रुक्मिणी तिराणिक यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. पुरस्कार सोहळ्या प्रसंगी आमदार किशोर जोरगेवार, डॉ. नंदकुमार राउत महाराष्ट्र राज्याचे मुख्य अव्वर सचिव, नियोजन विभाग मंत्रालय मुंबई, अनिता ठाकरे उपशिक्षणाधिकारी, जि.प. चंद्रपूर, समाधान भसारकर, गटशिक्षणाधिकारी, रविंद्रकुमार अंबूले प्रशासन अधिकारी, शिक्षक सहकार संघटनाचे जिल्हा अध्यक्ष अविनाश जुमडे, महिला राज्याध्यक्षा शुभांगी चौधरी, तसेच महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होती.

# आता भद्रावती येथे सामाजिक भावनेतून घडणार कलावंत

**दिग्दर्शक,सुप्रसिद्ध गायक आणि नाट्य कलावंत अनिरुद्ध वनकर यांची आज भद्रावती येथे एका पत्रकार परिषदेच्या निमित्ताने भेट झाली. यावेळी त्यांनी भद्रावती परिसरात त्यांच्या संस्थेद्वारे सुरू करण्यात येणाऱ्या नव्या उपक्रमांची माहिती दिली. दिग्दर्शक सिनेकलावंत, गायक अनिरुद्ध वनकर यांची नवे कलाकार घडविण्याची धडपड वाखाणण्याजोगी आहे. आपल्या भागातील लोकांनी कलेमध्ये प्राविण्य कमवावे हा आशावाद त्यांच्या मनामध्ये सतत कार्यरत दिसतो. हरहुन्नरी कलावंत म्हणून ते काम करीत असून त्यांचे 'अगिन तीरीया' हे नाटक आंतरराष्ट्रीय महोत्सवासाठी निवडले गेले आहे. जम्मू–काश्मीरला १६ फेब्रुवारी २०२४ रोजी टागोर टागोर हॉल श्रीनगर येथे सादरीकरण होणार आहे.**




अनेक कलावंत आणि लोककलावंतांचे स्वप्न असतं की आपल्या आयुष्यात काहीतरी नवीन घडावं. असंच एक स्वप्न उराशी बाळगून अनिरुद्ध वनकर नावाचा कफल्लक कलावंत आपल्या स्वकष्टाने भद्रावती येथील टाकळी या गावी पोहचला. अडीच एकर जागेवरती डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल कल्चरल सेंटर (बाईक) नावाचे एक सांस्कृतिक केंद्र उभे केलें . यातून भद्रावतीच नव्हे तर देशभरातून सामाजिक बांधिलकी जपणारे कलावंत घडतील आणि राष्ट्र निर्माणात आपले योगदान देतील असा विश्वास या केंद्राने व्यक्त केला आहे.

या जागेवर छत्रपती शिवाजी महाराज खुल्या रंगमंचाची निर्मिती झाली असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणून या परिसराला नाव दिलेले आहे . क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले या नावाने ट्रेनीग हॉल पूर्ण झालेला आहे. महात्मा गांधी झाडीपट्टी प्रदेश सांस्कृतिक संग्रहालय, डॉ. अब्दुल कलाम सांस्कृतिक संशोधन केंद्र ,वामनदादा कर्डक संगीत व नाटक कारखाना, बिरसा मुंडा आदिवासी नृत्य लोककला विभाग, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले वाचनालय व अभ्यासिका केंद्र निर्माण होणार आहे.या संपूर्ण सांस्कृतिक कार्यक्रमाचं केंद्र उभे झालेले आहे. या डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल कल्चरल सेंटरच्या उद्घाटन सोहळ्याचे अध्यक्ष महाराष्ट्रातील माजी मंत्री व सध्याच्या विधानसभेचे विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांच्या अध्यक्षतेखाली आणि प्रतिभा धानोरकर भद्रावती विधानसभा यांच्याहस्ते उद्घाटन सोहळा पार पडणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून आमदार विधान परिषद आमदार सुधाकर अडबाले आणि सीसीआरटी संस्कृती मंत्रालय भारत सरकार नवी दिल्लीचे चेअरमन डॉ. विनोद इंदुरकर प्रमुख उपस्थितीमध्ये लाभणार आहेत. या संपूर्ण सोहळ्यामध्ये नागपूर येथील सामाजिक न्याय विभागाचे प्रादेशिक उपायुक्त सिध्दार्थ गायकवाड, गोंडवाना विद्यापीठ

Dr. Babasaheb Ambedkar International Cultural Centre

कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण, तहसीलदार अनिकेत सोनवणे , ठाणेदार बिपिन इंगळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाउंडेशन नांदेड चे अध्यक्ष बापूसाहेब गजभारे, प्रा. डॉ. इसादास भडके ,इंजिनियर भास्कर चव्हाण स ,अनिल धानोरकर , कुशल मेश्राम,,रवी शिंदे, ड. भूपेंद्र रायपुरे, सुरेंद्र रायपुरे, गोपाल अमृतकर ,आणि काही मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये या डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल कल्चरल सेंटरचे उद्घाटन होणार आहे.

बाईक मध्ये देशभरातील कलावंत निर्माण करून अभ्यासाची गोडी आणि व्यसनमुक्त कलावंत तयार करणे हे अत्यंत महत्त्वाचे केंद्रस्थान या ठिकाणी राहणार आहे. या सेंटरमधून कोणत्याही वयोगटातील मुला मुलींना स्त्री–पुरुषांना प्रशिक्षित करून त्यांना स्वतःच्या पायावर उभे करणे. त्यांना भविष्यामध्ये कोणतीही अडचण येऊ नये असा हा या इंटरनॅशनल सेंटरचा मानस राहणार आहे. यानंतर लगेचच भारतातील तज्ज्ञांकडून तीन दिवसीय एक्टिंग आणि नाटकांचे धडे देण्यात येणार आहे. त्यानंतर त्याच दिवशी रात्री १३ तारखेला रात्री उद्घाटन सोहळ्यानंतर चुडाराम बल्हारपुरे लिखित 'गोंडवानाचा महायोद्धा वीर बाबुराव शेडमाके' हे नाटक मोफत रसिकांपुढे सादर होणार आहे. यामध्ये ३५ कलावंत कार्यरत असून या नाटकाचा निर्माता आणि दिग्दर्शक अनिरुद्ध वनकर आहेत. अनिरुद्ध वनकर हे या बाईक म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल सेंटरचे व्यवस्थापकीय संचालक असून ते लोक जागृती संस्थेचे अध्यक्ष सुद्धा आहेत. म्हणूनच या संपूर्ण सेंटरमध्ये अनेकांनी आपली उपस्थिती दर्शवावी आणि या सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन बाईकचे व्यवस्थापकीय संचालक अनिरुध्द वनकर यांनी केले आहे. आणि ३५ कलावंतांना प्रमाणपत्र वाटप होणार आहे. नाटक निःशुल्क असणार आहे. रात्री ७ ते१० या वेळेत नाटक सादरीकरण करण्यात येत आहे .



# ध्येयवेडे : डॉ.प्रकाश वाघ

**नाभिक समाजाच्याप्रति जिव्हाळा व नाभिक उत्थानाची तळमळ असणारे, त्यासाठी सतत कृतीचे तारण देऊन अहोरात्र मेहनत करणारे नाभिक युवा तालुकाध्यक्ष डॉ प्रकाश वाघ युवक व समाजसेवा करू इच्छिणाऱ्यांसाठी प्रेरणास्थळ आहे. नाभिक हिताचा विषय निघताच ते आपले विचार व्यक्त करताना म्हणतात.'माणूस जन्माला येतो. लहानाचा मोठा होतो. पुढे सुख–दुःखाची अनेक वादळे झेलत आयुष्य जगतो पण आयुष्य का जगतो? कशासाठी जगतो? आणि कुणासाठी जगतो? याची मात्र त्याला काहीच कल्पना नसते. पोटाची खळगी भरण्यासाठी आयुष्यभर काबाडकष्ट करतो.**

माणूस पूर्वी ८०/९० वर्षे जगायचा. आता ६०/७० वर्षे जगतो आणि मरून जातो. मेल्यानंतर कुटुंबीय नातेवाईक चार दिवस रडतात आणि विसरूनही जातात. आपण कितीही चांगले असलो तरी मेल्यानंतर आपली आठवण ही फक्त १०/१५ दिवसांपुरतीच असते. कारण आपण जगलेलो असतो ते केवळ आपल्या कुटुंबासाठी, मग जगावे तरी कुणासाठी? तर जगावे समाजासाठी. तुम्ही समाजाच्या कोणत्या समस्या सोडविता? तुम्ही कुणाच्यातरी कामी येता का? तुम्ही स्वतःच्या पलीकडे जाऊन जेंव्हा विचार करता त्याला शिक्षण असे म्हणतात. करिअर म्हणजे केवळ नोकरी मिळविणे किंवा व्यवसायात प्रगती करणे एवढाच संकुचित विचार नसावा. समाजाचा विचार करून जगणे म्हणजेच आयुष्य होय. समाजाच्या उन्नतीसाठी तसेच सुदृढतेसाठी निरपेक्ष भावनेने काम करणारे खऱ्या अर्थाने समाजाची संपत्ती आहे. अशी माणसे आज हाताच्या बोटांवर मोजता येतील एवढीच राहिली आहेत. यापैकी आवर्जून उल्लेख करावा असे डॉ. प्रकाश माधवराव वाघ हे होय. त्यांची समाजाप्रति निष्ठा बघून महाराष्ट्र नाभिक महामंडळ नाशिक जिल्हा पदाधिकाऱ्यांनी त्यांची निफाड तालुका नाभिक युवासेना अध्यक्षपदी निवड केली.निवड झाल्यानंतर संत शिरोमणी सेना महाराज तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांना आदर्श मानून समाजासाठी काहीतरी करायची इच्छा हा मनातील हेतू साध्य



करण्यासाठी धडपडत असतात.समाजाचा विकासाचे स्वप्न पहात तालुक्यातील सकल नाभिक समाज एकत्र करून निफाड तालुका नाभिक युवासेना कार्यकारिणी तयार केली. समाजाला सामाजिक एकतेच्या श्रृंखलेत एकत्र आणले. डॉ. वाघ यांचे कार्य समाजासाठी आदर्श, प्रेरणादायी व कौतुकास्पद आहे. खरंच सांगायचं तर प्रकाश वाघ यांचा व्यवसाय डॉक्टरकी असल्याने ते पशुसेवा करतात. परंतु आपला जन्म नाभिक कुळात झाला असल्याने पशुसेवा बरोबरच समाजसेवा करून आपला जन्म खऱ्या अर्थाने सार्थकी लावण्याचा प्रयत्न ते करीत आहेत. संपूर्ण तालुक्यामध्ये आपल्या दैवतांच्या जयंती असो, पुण्यतिथी असो सर्व पदाधिकाऱ्यांसह एकत्र आणून साजरी करतात. समाजातील कुणाचा साखरपुडा, लग्न, दशक्रिया, वर्षश्राद्ध तसेच समाजहिताचा कुठलाही कार्यक्रम असो स्वतः सर्व युवा पदाधिकाऱ्यांसह सदैव तत्परतेने हजर असतात. सरकारचे लोकप्रतिनिधी खासदार, आमदार आणि अन्य पदाधिकारी यांना समाजातील अडीअडचणी दूर करण्यासाठी निवेदने देऊन वेळोवेळी समाजबांधवांना मार्गदर्शन करतात. सर्व युवा सेना पदाधिकाऱ्यांना स्नेहसंमेलनाद्वारे विचारविनिमयातून आपल्या पदाची जबाबदारी सोपवून कार्य करण्यास सांगतात, कार्यकर्ता हा युवा सेनेचा आत्मा असून सर्व जुन्या व नवीन कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन तालुक्यातील प्रत्येक गावांमध्ये युवा सेनेचे आचार विचार पोहोचवून तसेच गावागावात युवासेना संघटनेची बांधणी करून सर्वसामान्य गोरगरीब समाजबांधवांची कामे करण्यासाठी मार्गदर्शन करतात. महाराष्ट्र राज्य नाभिक महामंडळाचे कार्य आणि उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून समाजहितासाठी व समाजाच्या विकासासाठी शासकीय योजना समाजातील तळागाळातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी ते सदैव तत्पर असतात. अशा नाभिक समाजभूषण, समाजरत्न असलेल्या डॉ. वाघ यांच्या कार्यास सलाम करायलाच पाहिजे असे वाटते.

**डॉ. यशवंत घुमे**

# मुधोली येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे आयोजन १८ ते २४ जानेवारीला

## विवेकानंद महाविद्यालयाचा उपक्रम

**भद्रावती । प्रतिनिधी**

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली संलग्नित व विवेकानंद ज्ञानपीठ (कॉन्व्हेंट) वरोरा द्वारा संचलित स्थानिक विवेकानंद महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आजादी का अमृत महोत्सवी वर्षानिमित्त 'मेरी माटी मेरा देश' या संकल्पनेवर आधारित विद्यापीठ आपल्या गावात, राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिराचे आयोजन येत्या १८ ते २४ जानेवारी दरम्यान तालुक्यातील मुधोली गावात करण्यात आले आहे. शिबिराचे उद्घाटन १९ जानेवारीला दुपारी ३ वाजता होणार असून

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विवेकानंद ज्ञानपीठ (कॉन्व्हेंट) वरोरा चे उपाध्यक्ष जयंत टेमुर्डे राहणार आहेत.विधान परिषदेचे आमदार सुधाकर अडबाले यांच्या हस्ते उ उद्घाटन होणार असून प्रमुख मार्गदर्शक म्हणून चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष रवींद्र शिंदे असतील. यावेळी स्वर्गीय श्रीनिवास शिंदे मेमोरियल रविंद्र शिंदे चॅरिटेबल ट्रस्ट चंद्रपूरचे अध्यक्ष प्रा. धनराज आस्वले, मोहर्ली वन विभागाचे आरएफओ संतोष थिपे, विवेकानंद ज्ञानपीठ (कॉन्व्हेंट) वरोरा चे कोषाध्यक्ष अभिजीत बोथले, जिल्हा परिषद चंद्रपूरचे माजी सभापती तुळशीराम श्रीरामे, माजी सदस्य मारोती गायकवाड आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.२० तारखेला शनिवारी गावातील नागरिकांसाठी आरोग्यविषयक शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात वैद्यकीय अधिकारी डॉ. राजू बोबडे, डॉ. दिनेश मेश्राम हे तपासणी करतील. बौद्धिक कार्यक्रमात भद्रावती येथील सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती सुषमाताई शिंदे बेटी बचाव बेटी पढाव या विषयावर मार्गदर्शन करणार असून दुसऱ्या सत्रात ग्राहक संरक्षण कायदा २०१९ या विषयावर अखिल भारतीय ग्राहक पंचायत चंद्रपूरचे पदाधिकारी पुरुषोत्तम मत्ते,वसंत वऱ्हाटे, वामन नामपल्लीवार, पत्रकार प्रवीण चिमूरकर मार्गदर्शन करणार आहेत. २१ तारखेला रविवारी कायदेविषयक शिबिराचे आयोजन करण्यात आले असून भद्रावती बार असोसिएशनचे ड. राजरत्न पथाडे, ड .प्राशिष ताठे, ड. सुनील नामोजवार कायदेविषयक मार्गदर्शन करतील.

२२ तारखेला ग्रामीण विकासात युवकांचे योगदान या विषयावर स्तंभलेखक डॉ. यशवंत घुमे हे मार्गदर्शन करणार आहेत. त्यानंतर मेरी माटी मेरा देश या विषयावर डॉ. जयवंत काकडे यांचे मार्गदर्शन होईल. २३ तारखेला मंगळवारी पशुचिकित्सा शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात डॉ. वसंत जांभुळे, डॉ. विकास ताजने, डॉ. दीपक बेहानिया , डॉ .दत्ता नन्नावरे, डॉ. भागवत दाबेराव पशुंची चिकित्सा करतील. दुपारच्या बौद्धिक सत्रात मतदान जागृती व रस्ता वाहतूक सुरक्षा या विषयावर नायब तहसीलदार मल्लीक पठाण, वाहतूक शाखेचे पोलीस चंदू ताजने, डॉ. विजय टोंगे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.२४ जानेवारीला बुधवारी सकाळी १०वाजता समारोपीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विवेकानंद ज्ञानपीठ (कॉन्व्हेंट) वरोरा सचिव अमन टेमुर्डे राहतील. प्रमुख मार्गदर्शक भद्रावतीचे तहसीलदार अनिकेत सोनवणे राहतील. प्रमुख अतिथी म्हणून भद्रावती पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आशितोष सपकाळ, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. श्याम खंडारे, जिल्हा समन्वयक डॉ. विजया गेडाम, माजी सदस्य महेश टोंगे उपस्थित राहतील. या शिबिराचे यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव उमाटे,राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. उत्तम घोसरे, सहकार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश पारेलवार, मुधोलीचे सरपंच बंडू नन्नावरे, उपसरपंच वैशाली सिडाम, पोलीस पाटील सुनीता गराटे, मुख्याध्यापक कैलास उरकुडे, शंकर गायकवाड, ग्रामसेवक,विजय पचारे, तंटामुक्ती समिती अध्यक्ष प्रमोद सोनवणे, वन हक्क समितीचे अध्यक्ष श्रीकृष्ण दडमल, वन समिती अध्यक्ष कार्तिक राणे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष हनुमान राणे यांच्यासह ग्रामस्थ करीत आहेत. या शिबिरात सतत सात दिवस महाविद्यालयातील ७५ शिबिरार्थी मुक्कामी सहभागी राहणार असून दररोज श्रमसंस्कार, सर्वेक्षण, बौद्धिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

# जुनी पेन्शन योजना चालू करण्यासाठी रेल्वे कर्मचाऱ्यांचे उपोषण

## उपोषणात सेन्ट्रल रेल्वे मजदूर युनियन वरोरा शाखेचाही सहभाग–राजेंद्र मर्दाने

**वरोरा । प्रतिनिधी**

जुनी पेन्शन योजना लागू करावी व नवीन पेन्शन योजना रद्द करावी या एकमेव मागणीसाठी स्थापित जांइट फ्रंट रिस्टोरेशन ऑफ ओल्ड पेन्शनचे आदेश व एआयडीईएफ च्या निर्देशानुसार ८ ते११ जानेवारी २०२४ दरम्यान देशातील केंद्रीय कर्मचारी संस्थानांसमोर साखळी उपोषण करीत सरकारचे लक्ष आकर्षित करण्याचा प्रयत्नात आहे.भारतीय रेल्वेची मान्यता प्राप्त ट्रेड युनियन एनएआयआर च्या आवाहनानंतर वरोरा रेल्वे स्टेशन टिकिट घरासमोरील परिसरात मंडप लावून १० जानेवारीला सेन्ट्रल रेल्वे मजदूर युनियन वरोरा शाखेच्या वतीने जुनी पेन्शन योजना लागू करावी व नवीन पेन्शन योजना रद्द करावी यासाठी एक दिवसीय साखळी उपोषण करण्यात आले. कर्मचाऱ्यांच्या वतीने नवीन पेन्शन योजनेचा विरोध करीत ' सेन्ट्रल रेल्वे मजदूर युनियन जिंदाबाद, जिंदाबाद' , गो बॅक गो बॅक, एनपीएस गो बॅक ', ' नही किसीसे भीक मागंते, हम हमारा हक मांगते ' , एनपीएस भगाओ,ओपीएस लाओ अशी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.यावेळी सेन्ट्रल रेल्वे मजदूर युनियन शाखा वरोरा अध्यक्ष राकेश कुमार, कार्याध्यक्ष विनोद कुमार, सचिव बी.के.भुयान, कोषाध्यक्ष आशिष हरणे, सहसचिव नरेश बारीक, जितेंद्र मधुकर,राकेश देउरकर,आनंद येटे, मालती सेलुकर, सचिन ताजने, मनोज धांडे,अजय शहा, विवेक झाडे इतर अनेक रेल्वे कर्मचाऱ्यांना या उपोषणामध्ये मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला आहे.



**सर्व रेल्वे कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी**

**३५ वर्ष सेवा देऊनही रेल्वे कर्मचाऱ्यांना जुन्या पेन्शन योजनेचा लाभ मिळत नाही उलट ५ वर्ष आमदार/ खासदार राहणाऱ्यांना पेन्शनचा लाभ मिळतो, हा लाभ त्यांना वेगवेगळ्या प्रकारे मिळतो, हा वर्षोनुवर्षे सेवा देणाऱ्या केंद्रीय कर्मचाऱ्यांवर अन्यायच आहे. यासाठी म्हणून सर्व रेल्वे कर्मचाऱ्यांची प्रमुख न्यायोचित मागणी आहे की त्यांचेसाठी भारत सरकारने १/१/२००४ पासून लागू केलेली नवीन पेन्शन योजना रद्द करुन जुनी पेन्शन योजना लागू करावी.**

**बी. के. भुयान,**

**सचिवसेन्ट्रल रेल्वे मजदूर युनियन शाखा, वरोरा**

# जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत खासदार व पालकमंत्री यांच्यामध्ये निधीची टक्केवारी घेण्यावरून अश्लील भाषेत शिवीगाळ

## अंगावर आला तर त्याला शिंगावर घेणारच–हेमंत पाटील खासदार हिंगोली

**हिंगोली**–जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत २०२४– २५ या वर्षासाठी २३८ कोटी ७१ लाख ७१ हजार रुपयांच्या प्रारूप आराखड्यास मान्यता देण्यासाठी दिनांक ६/०१/२०२४ रोजी ऑनलाइन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते या बैठकीला हिंगोली जिल्ह्याचे पालकमंत्री तथा अल्पसंख्यांक मंत्री अब्दुल सत्तार हे ऑनलाइन जोडल्या गेले होते, या बैठकीसाठी स्थानिक आमदार व हिंगोली लोकसभेचे खासदार हेमंत पाटील व निमंत्रित जिल्हा नियोजन समिती चे सदस्य व जिल्हाधिकारी उपस्थित होते, या ऑनलाइन बैठकीमध्ये खासदार हेमंत पाटील व पालकमंत्री अब्दुल सत्तार यांच्यामध्ये अचानक अश्लील भाषेत शाब्दिक चकमक सुरू झाली यांनी माध्यमांशी संवाद साधला असता म्हणाले की हिंगोली जिल्हा हा मागास जिल्हा आहे जिल्ह्याला बळ देण्यासाठी पालकमंत्रीची निवड केली जाते पण हेच पालकमंत्री सात महिन्याला जिल्हा नियोजन समितीची बैठक घेत असतील तर यांना आपण काय समजावे ,असा सवाल खासदार हेमंत पाटील यांनी उपस्थित केला त्याच बरोबर पालकमंत्री यांचे नातेवाईक हिंगोलीत येतात गुत्तेदाराची चर्चा करतात त्यानंतर त्यांना खासदार किंवा आमदाराचे पत्र आणायला सांगतात मतदारसंघातील मतदार असल्यामुळे आम्हालाही पत्र द्यावे लागते व याच पत्राचा गैर फायदा घेऊन निधी वाटप करत असल्याचा आरोप यावेळी खासदार हेमंत पाटील यांनी केला मागील वर्षी जिल्हा नियोजन समिती मधून २५० डीपी खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला होता परंतु डीपी न खरेदी करता हा निधी इतरत्र वळविण्यात आला याबाबत बैठकीत



प्रश्न विचारला असता तर सीड येण्याचे पालकमंत्री यांना कारण नाही असेही बोलताना यावेळी म्हणाले , यादरम्यान पालकमंत्र्यांनी खासदार हेमंत पाटील यांना म्हणाले तु कशाला शेण खायला परसेंटीस घेतो काय या वरुन दोघांमध्ये अश्लील भाषेत शिविगाळ झाल्याची रेकॉर्ड राज्यभर फिरत आहे, एकीकडे दोघांनी आपसामध्ये अश्लील भाषेत शिविगाळ जरी केली असली तरी दुसरीकडे मात्र आखाडा बाळापूर येथे खासदार हेमंत पाटील यांनी आयोजित केलेल्या मुख्यमंत्र्यांच्या शिव संकल्प सभेला आमदार व पालकमंत्र्याचे फोटो एकाच बॅनर दिसून आले आहेत व एकाच व्यासपीठावर दोघे दिसणार आहे, मागील पाच वर्षाचा विकास कामाचा आढावा घेतला तर हिंगोली जिल्ह्यांमध्ये विकासाची कामे शून्य प्रमाणात आहे येत्या लोकसभा निवडणुकीत खासदार हेमंत पाटील हे इच्छुक जरी असले तरी जनतेमधून हेमंत पाटील यांच्यावर नाराजीचा सूर आहे खासदार हेमंत पाटील यांनी मधमाशी साधलेला संवाद हा जरी खरा असला तरी दोघांमधील अश्लील भाषेतील शिवेगाळ त्यामुळे या सर्व प्रकाराला काय म्हणून समजावे व दोघांमधून जनतेने विकासाचा काय आदर्श घ्यावा अशी जोरदार चर्चा हिंगोली जिल्ह्यांमध्ये एकायला मिळत आहे.

### नव्या वर्षात ५ हजार लाभार्थी निवडीचे उद्दिष्ट

## अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ अध्यक्ष नरेंद्र पाटील यांची माहिती

**परभणी । प्रतिनिधी**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या माध्यमातून परभणी जिल्ह्यात नव्या वर्षात सुमारे ५ हजार लाभार्थ्यांची निवड केली जाईल, अशी ग्वाही अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी मंगळवारी (दि.९) पत्रकार परिषदेत दिली.येथील जिल्हाधिकारी कार्यालयात अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक आयोजित करण्यात आली. त्यानंतर पाटील यांनी पत्रकारांशी हितगूज केले. याप्रसंगी आमदार सौ. मेघना साकोरे–बोर्डीकर, भाजपाचे माजी महानगर जिल्हाध्यक्ष आनंद भरोसे यांची उपस्थिती होती.या महामंडळाच्या माध्यमातून संपूर्ण राज्यात ७५ हजार मराठा उद्योजक तयार झाले आहेत. साडेपाच कोटीवर कर्ज बँकांकडून वाटप झाले आहे.



तर ६१६ कोटीचा व्याज परतावा देण्यात आला आहे, असे स्पष्ट करतेवेळी अध्यक्ष पाटील यांनी नव्या वर्षात परभणी जिल्ह्यासाठी ५ हजार लाभार्थी निवडीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून लवकरच या जिल्ह्यात यशस्वी उद्योजकांना मेळावा आयोजित केला जाईल, अशी ग्वाही दिली.देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना या महामंडळाची पुनर्निमिती झाली. परभणी जिल्ह्यात एकूण १ हजार १११ बँक कर्ज मंजूर झालेले एकूण लाभार्थी आहेत. बँकांनी एकूण ७१ कोटी ८७ लाख रूपये कर्ज मंजूर करून रक्कम वितरित केली आहे. महामंडळाने आजपर्यंत लाभार्थ्यांना ८ कोटी ५७ लाख रूपये इतका व्याज परतावा दिला आहे. महामंडळाकडून एकूण व्याज परतावा सुरू झालेल्या लाभार्थ्यांची संख्या ९२५ इतकी आहे, अशी माहिती त्यांनी दिली. महामंडळासाठी जिल्ह्यात राष्ट्रीयीकृत बँकांकडून अपेक्षित काम झालेले नाही. तसेच सहकारी बँकादेखील महामंडळाच्या योजना राबविण्याबाबत उदासीन असल्याचा आरोप त्यांनी केला. या पार्श्वभुमीवर जिल्ह्यात राष्ट्रीयीकृत बँकांच्या शाखा वाढवाव्यात जेणेकरून त्यांच्यामार्फत अधिकाधिक लाभार्थ्यांपर्यंत योजना पोहोचतील, अशी सूचना आ. बोर्डीकर यांनी बैठकीत केली असल्याचे पाटील म्हणाले.महामंडळाचे काम पारदर्शक व ऑनलाईन पध्दतीने सुरू असून सर्व करार वेबसाईटवर टाकलेले आहेत. शिवाय कर्जाची रक्कम व व्याज परतावा लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होतो. व्याज परतावा वेळेत मिळण्यासाठी किंवा शेतकर्यांनी केलेला क्लेम २४ तासात मिळण्यासाठी नवी यंत्रणा उभी केली जाणार आहे, असे नमूद करीत वर्षभरात दौरे, मेळावे, संवाद बैठका घेवून जनजागृती करून जास्तीत जास्त लाभार्थ्यांपर्यंत योजना पोहोचण्यासाठी जिल्हास्तरावर आ.मेघना बोर्डीकर यांच्या पुढाकाराने लाभार्थी मेळावा घेवून ५ हजाराचा टप्पा गाठू, असा विश्वासही पाटील व्यक्त केला.

## व्हाईस ऑफ मीडिया गंगाखेड पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी अन्वर शेख लिंबेकर




**गंगाखेड**–व्हाईस ऑफ मीडिया गंगाखेड तालुका पत्रकार संघाची बैठक दि. ६ जानेवारी शनिवार रोजी येथील शासकीय विश्राम गृहात संपन्न झाली. या बैठकीत तालुकाध्यक्षपदी अन्वर शेख लिंबेकर यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. शासकीय विश्रामगृह येथे दि. ६ जानेवारी रोजी ज्येष्ठ पत्रकार तथा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष दगडूसेठ सोमाणी यांच्या अध्यक्षतेखाली गंगाखेड तालुक्यातील सर्व पत्रकार बांधवांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत व्हाईस ऑफ मीडिया गंगाखेड तालुका पत्रकार संघाच्या तालुकाध्यक्षपदी अन्वर शेख लिंबेकर, कार्याध्यक्षपदी संजय सुपेकर, सचिव पदी गुणवंत कांबळे, उपाध्यक्ष पदी अली चाऊस यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी ज्येष्ठ पत्रकार नारायण मेहता, मो. जावेद इनामदार, तुकाराम आय्या, महालिंग भिसे, शंकर इंगळे, प्रा. गोविंद चोरघडे, राजेश कांबळे, उद्धव चाटे, भीमराव कांबळे, भागवत जलाले, शिवाजी कांबळे, राहुल साबणे, ज्ञानोबा कदम, राजकुमार मुंडे, मोहसीन खान, रामकृष्ण बचाटे, शेख महेमूद, अनिल साळवे, प्रदीप गौरशेटे, बाळासाहेब जंगले, गोपाळ मंत्री, राम पवार, तुषार उपाध्याय आदी पत्रकार बांधव उपस्थित होते.

### ८ वे विश्व शब्द मराठी साहित्य संमेलन मॉरिशसला

## मॉरिशस संमेलनात दगडू लोमटे यांचा सहभाग

**अंबाजोगाई** –शब्द परिवार आयोजित आठवे विश्व शब्द मराठी साहित्य संमेलन यावर्षी १२ ते – १७ जानेवारी २०२४ रोजी मॉरिशस या देशात होत आहे. यापूर्वी सातवे शब्द साहित्य संमेलन नेपाळ येथे पार पडले होते. गेल्या संमेलनाचे मावळते अध्यक्ष दगडू लोमटे हे या संमेलनास उपस्थित राहणार आहेत.



यावर्षी ८ व्या विश्व शब्द मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष प्राचार्य डॉ. अनिल गजभिये – इंदोर हे असतील तर उद्घाटक सुप्रसिध्द चित्रकार, कलावंत विजय राऊत – मुंबई हे असतील. उद्घाटन सत्राचे अध्यक्ष प्रकाश निर्मळ, भाषा अभ्यासक, पुणे हे असणार आहेत. कवी संमेलन, गझल संमेलन, परिसंवाद, कथाकथन व पर्यटन असा भरगच्च कार्यक्रम आयोजित केला असल्याचे शब्द परिवाराचे संजय सिंगलवार व शशी डंभारे यांनी जाहीर केले आहे. यापूर्वीचे मावळते संमेलन अध्यक्ष दगडू लोमटे, आणि ईतर माजी संमेलन अध्यक्ष उपस्थित राहणार आहेत. दगडू लोमटे यांनी यापूर्वी श्रीलंका, नेपाळ, बांगलादेश या देशांना सामाजिक उपक्रमा अंतर्गत भेटी दिल्या आहेत. या वर्षी ते संमेलना निमित्त मॉरिशसला जात आहेत.

## परशुराम महामंडळ स्थापनेचे परिपत्रक काढा पालकमंत्री मा.ना.संजय बनसोडे यांना साकड

**परभण । प्रतिनिधी**

परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापनेचे अधिकृत शासन परिपत्रक ( जि. आर.) काढावे या मागणीसाठी क्रिडा व युवक कल्याण, बंदरे, तथा परभणीचे पालकमंत्री संजय बनसोडे यांना एक निवेदन देण्यात आले. या निवेदनात पाथरी येथील प्रकाशदेव केदारे हे दि. १६ डिसेंबर रोजी पाथरी येथे अन्न त्याग उपोषणास बसले होते. यापूर्वी आझाद मैदान मुंबई, जालना, संभाजी नगर येथे मोर्चा अनेक अंदोलने झाली, या बाबत शासन दरबारी दखल घेतली नाही. परंतु प्रकाशदेव केदारे १६ डिसेंबर रोजी अमरण उपोषणाला बसल्यानंतर उपोषणाच्या पाचव्या दिवशी दि. २० डिसेंबर २०२३ रोजी पालकमंत्री बनसोडे यांनी पालकमंत्री या नात्याने आपण भ्रमणध्वनी




संदेशाद्वारे परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापण करण्यासाठी कटीबध्द आहोत. तसेच पाठपुरावा करु कळवले होते. प्रशासनास सहकार्य करावे हे कळवले. त्यानंतर आपल्या विनंतीस मान देवून उपोषण स्थगीत केले. परंतु मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घोषणा केली होती की, पहिल्या कॅबिनेट मध्ये आर्थिक महामंडळाचा विषय पटलावर घेऊ परंतु अद्यापही जि. आर काढला नाही, जि. आर. त्वरीत काढावा अशी आग्रही मागणी करण्यात आली. या मागणीची लवकरच पूर्तता केली जाईल असे आश्वासन पालकमंत्री बनसोडे यांनी दिले. या निवेदनावर आलोक चौधरी (नगरसेवक) योगेश जोशी, गजानन शेटे भगीरथ बद्दर,सुधाकर गुरु गोळेगावकर,विठू गुरु वाझुरकर,लक्ष्मीकांत दडके,प्रकाशदेव केदारे,प्रवीण जोशी,नितीन पाटील,सुनिल उन्हाळे,सुरेश मुळे गजानन जोशी दिनेश चोथवे (सोनपेठकर) आदींच्या सह्या आहेत.

# पाथरी तालुक्यातील उच्चपातळी बंधाऱ्यांची तहान भागणार

**पाथरी । प्रतिनिधी**

तालुक्यातील ढालेगाव,तारुगव्हाण,मुदगल आणि खडका या चार बंधारा कार्यक्षेत्रात दुष्काळ असल्याने पिण्या साठी कालव्या द्वारे किमान तीन पाणी पाळ्या सोडून या भागातील नागरीक आणि जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्राधान्याने सोडवण्याची मागणी माजलगावचे माजी आमदार तथा योगेश्वरी शुगर्सचे चेअरमन आर टी देशमुख जीजा यांनी सोमवार ८ जानेवारी रोजी छ. संभाजीनगर येथील जायकवाडी पाटबंधारे विभागाच्या कालवा समिती बैठकीत लाऊन धरत लेखी निवेदन दिले.याला कालवा समितीचे अध्यक्ष मंत्री ना. संदिपान भुमरे यांनी या चार ही उच्चपातळी बंधा–यात आवश्यक तेवढे पाणी पुढील काळात देण्याचे मान्य केले असल्याची माहिती माजी आ आर टी देशमुख जीजा यांनी फोन वरुन बोलतांना दिली.

जायकवाडी लाभक्षेत्रातील पाणी साठ्याचे यथायोग्य नियोजन करण्या साठी अधिक्षक अभियंता व प्रशासक,लाभक्षेत्र विभाग प्राधिकरण ची बैठक गारखेडा परिसरातील लाभक्षेत्र विकास भवन येथे पालकमंत्री तथा या समितीचे अध्यक्ष ना. संदिपान भुमरे यांच्या अध्यक्षते खाली संपन्न झाली. या बैठकी साठी सदस्य मंत्री ना अतुल सावे, विरोधी पक्ष नेते ना अंबादासराव दानवे, माजी आ आर टी देशमुख जीजा, अधिक्षक अभियंते तथा सदस्य सचिव कालवा सल्लागार समितीचे सब्बीनवार, सहाय्य अभियंता जायकवाडी पाटबंधारे विभाग परभणीचे अमोल सुर्यवंशी यांच्या सह इतर सदस्याची उपस्थिती होती.या वेळी आर टी देशमुख यांनी या नियोजन बैठकीत समन्यायी पद्धतीने पाणी वाटप व्हावे अशी मागणी करत पाथरी तालुक्यात दुष्काळ



असुन येत्या महिणा भरात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभिर होणार असल्याने ढालेगाव, तारुगव्हाण, मुदगल, आणि खडका या चार उच्च पातळी बंधा–यात कालव्या व्दारे पाणी सोडण्याची मागणी लाऊन धरत, बी ५९ चारी अनेक ठिकाणी ना दुरुस्त आहे त्यातून पाणी गळती होते ती थांबवण्यात यावी आणि संपुर्ण चारी उपचा–या यातील गाळ आणि झाडे झुडपे काढून शेवटच्या शेतक–यांना पाणी पोचवण्या साठी उपाय योजना करण्याची मागणी करत अपु–या कर्मचा–यांच्या जागा त्वरीत भरव्या या मुळे पाणी वापर संस्था आणि औद्योगिक वापरा यांच्यात सुसंवाद होऊन पाणी पाळीचे योग्य नियोजन होईल.या साठी किमान तात्पुरत्या स्वरुपात कर्मचारी भरती करण्याची मागणी केली.या वर्षी पाणी कमी असल्याने शेतक–यांना कृषी विभागा मार्फत योग्य ते मार्गदर्शन करून सुक्ष्मसिंचना कडे वळवत जास्तित जास्त क्षेत्र कमी पाण्यात सिंचना साठी प्रयत्न करवे अशी मागणी या बैठकीत योगेश्वरी शुगर्स चे चेअरमन माजी आ आर टी देशमुख जीजा यांनी कालवा समिती बैठकीत लाऊन धरत या विषयीचे निवेदन या बैठकीचे अध्यक्ष पालकमंत्री ना. संदिपान भुमरे यांच्या कडे केली. या वेळी पालकमंत्री ना भुमरे यांनी या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत या पुढे अजून किमान दोन पाणी पाळ्या देण्याचे मान्य करत अधिका–यांनी ही देशमुख यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यामुळे पुढील उन्हाळ्यात किमान अजून दोन पाणी पाळी मिळतील अशी अपेक्षा ठेवल्याने पिण्याच्या पाण्या सह काही अंशी सिंचनाचा ही प्रश्न मार्गी लागल्याची भावना शेतक–यां मधून व्यक्त होत आहे.

## पालघरच्या राष्ट्रवादी कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश:उद्धव ठाकरेंनी बांधले शिवबंधन



**मुंबई**–महाराष्ट्रात एकीकडे सत्तासंघर्षाचा निकाल लागणार आहे, तर दुसरीकडे राजकीय नेत्यांच्या गाठीभेटी सुरू आहेत. पालघरमधील अजित पवार गटाच्या राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी आज मातोश्रीवर जाऊन ठाकरे गटात प्रवेश केला. याप्रसंगी उद्धव ठाकरे यांनी त्यांचे स्वागत करत खोक्यांच्या मागे पळालेले म्हणत राष्ट्रवादीवर टीकेची तोफ डागली आहे.उद्धव ठाकरे म्हणाले की, तुम्हा सर्वांचे शिवसेनेत स्वागत आहे.. तुम्ही रोज चॅनलवर बघत असाल.. लोक शिवसेनेत येत आहेत.. आता शिवसेनेची ताकद वाढत आहे.. हा पळून जाणाऱ्यांचा गट नाही, लढणार्यांचा आहे.. आज महाराष्ट्रात ज्या प्रकारचे राजकारण चालू आहे. सामान्यतः लोक सत्तेत असलेल्या पक्षाला सोडून दुसऱ्या पक्षात सामील होतात..आधीच्या लोकांप्रमाणेच खोट्याच्या लोभापोटी पक्ष सोडला होता..पण शिवसेनेला सत्तेत आणण्यासाठी तुम्ही लोक एकत्र आला आहात.ठाकरे पुढे म्हणाले की, आता विनायक राऊत म्हणाले की, तुम्हीही (उद्धव) पालघरला जावे. हरकत नाही, मी लवकरच पालघरला येईन. सभा घेईन. २०१४–१९ च्या निवडणुकीत पालघर जिंकले होते.. तिसऱ्यांदाही जिंकू. २३ तारखेपासून नाशिकला पक्षाची बैठक आहे. त्यानंतर मी पालघरला सभा घेणार आहे. तुम्ही लोकं तारीख निश्चित करा. मी सभेला येईन. तुमचं शिवसेनेत स्वागत आहे. आता तुम्हाला शिवबंधन बांधलं आहे. आता तुम्ही सर्वजण निवडणुकीच्या तयारीला लागा.दरम्यान, शिवसेना आमदारांच्या अपात्रतेप्रकरणी आज विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचा निकाल येणार आहे. याआधी राहुल नार्वेकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतल्याच्या मुद्द्यावरून उद्धव ठाकरे यांनी नार्वेकरांवर कडाडून टीका केली होती. ही भेट म्हणजे न्यायाधीशांनी आरोपीची भेट घेण्यासारखे आहे, असे ते म्हणाले होते.

# एकाग्रतेने ध्येय प्राप्ती करिता मेहनत हेच यशस्वीतेचे रहस्य-आ.सुधाकर अडबाले

**पुलगाव | प्रतिनिधी**

यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी एकाग्रतेने ध्येयवेडे होऊन मेहनत करणे जरुरी आहे असे विचार आ.सुधाकर अडबाले यांनी स्थानिक आर.के. हायस्कुल व कनिष्ठ महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारोह व विविध गुणदर्शन सोहळ्या निमित्त आयोजित कार्यक्रमात बोलतांना व्यक्त केले. या कार्यक्रमात कार्यक्रमाचे अध्यक्ष आर. के. हायस्कुल ट्रस्टचे विश्वस्त द्वारकादास दरक , प्रमुख अतिथी म्हणून आर.के. शाळा समिती अध्यक्ष रंजनबाबू केजडीवाल , विधान परिषद सदस्य आ. सुधाकर अडबाले,विजुक्टा महासचिव प्रा.डॉ. अशोक गव्हाणकर , आर.के. हायस्कुल व कनिष्ठ महाविद्यालय प्राचार्य संजय सहारे ,आर. के.हायस्कुल ट्रस्टचे मुख्य समन्वयक नुरसिंग जाधव , मुख्याध्यापिका आर.के.ज्ञानमंदिरमच्या मुख्याध्यापिका राजश्री ओक , आर.के. हायस्कुलच्या उपमुख्याध्यापिका माया वंडलकर , उपप्राचार्य सुनिल भोयर, पर्यवेक्षक गणेश इंगळे, पर्यवेक्षक लालबहादूर यादव , तसेच अंशतः अनुदानित विभाग प्रमुख जितेंद्र वर्मा इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे उदघाटन माता शारदा व संस्थेचे संस्थापक स्व.रंगलाल केजडीवल यांच्या प्रतिमेचे पूजन, माल्यार्पण व दीप प्रज्वलन करून करण्यात आले. याप्रसंगी कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थिनीनी शारदास्तवन वर नृत्य सादर केले. उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले याप्रसंगी कनिष्ठ महाविद्यालयातील विध्यार्थ्यांनीनी स्वागत गीत सादर केले. उपमुख्याध्यापिका माया वंडलकर यांनी उपस्थित मान्यवरांचा परीचय करून दिला तर महाविद्यालयाचे प्राचार्य संजय सहारे यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचे अहवाल वाचन केले. या प्रसंगी उपस्थित मान्यवर सुधाकर अडबाले, सदस्य विधान परिषद महा. राज्य, अशोक गव्हाणकर महासचिव विज्यूक्ता यांचे शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्याद्वारा स्वरचित पाऊलवाट या पुस्तकाचे विमोचन करण्यात आले. १२ वी बोर्ड परीक्षेत सर्वाधिक गुण घेऊन प्रथम येणारा विद्यार्थी *हिमांशू गजानन गव्हाने याला रोख पारितोषिक प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तसेच सिद्धेश राजेंद्र गोटे, वेदांत चंद्रशेखर वानखडे, प्रांजली योगेश वासाडे, कृष्णा नारायण मांढरे, आयुष क्षीरसागर व अनुराग सिंग यांनी विज्ञान विभागात उत्तम कामगिरी केल्याबद्दल रोख पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. सोबतच वाणिज्य विभागातून सर्वाधिक गुण प्राप्त करणारी खुशी रामप्रसाद मिश्रा ला रोख पारितोषिक, प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. सोबतच क्रीश अजय पिंपोळे, शिवम उमेश भुसारी व इनसिया नरुद्दीन बोहरा यांनाही त्यांच्या उत्कृष्ठ कार्याबद्दल रोख पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तर कला विभागातून प्रथम येणारी सिद्धी अनिल भोयर हिला रोख पारितोषिक, प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले तर प्रतीक विजय बुटके हिला सुद्धा उत्तम कामगिरी केल्याबद्दल रोख पतिटोधिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.मागासवर्गीय विभागातून विज्ञान शाखेतून सर्वाधिक गुण प्राप्त करणारी निर्वाणी सुदर्शन अढाऊ हिला सुद्धा रोख पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. १० वी बोर्ड परीक्षेत सर्वाधिक गुण घेणारा केतन सुनिल ढाले ला रोख पारीतोषिक, प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. सोबतच अनुष्का रविंद्र सावरकर, साक्षी किशोर हत्तीमारे, विनय अमर सावळकर व प्रणय वीरेंद्र सावरकर यांना सुद्धा त्यांच्या उत्कृष्ठ कामगिरीबद्दल रोख पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. सोबतच ज्ञानमंदिरं विभागातून १० वी बोर्ड परीक्षेत सर्वाधिक गुण घेणारी रिया राजेश पोकळे सोबत ऋतुजा राहुल हाडके, ऋतुजा नेमीचंद चंदनखेडे व ओशन गणेश पाटील यांना रोख पारितोषिक, प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. सोबतच राज्य स्तरावर पोहचलेले विद्यार्थी तन्मयी हितेश पैकीने व आर्या विवेक राऊत यांनाही रोख पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तर विज्ञान विभागातून विज्ञान प्रदर्शनी राज्य स्तरावर पोहचल्या बद्दल संबंधित विद्यार्थीना गौरविण्यात आले. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांपैकी शाळा समिती अध्यक्ष रंजनबाबू केजडीवाल यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार व्यक्त करणारे मनोगत व्यक्त केले. अशोक गव्हाणकर यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारे विचार व्यक्त केले. संजय सहारे प्राचार्य आर. के. हायस्कुल व कनिष्ठ महाविद्यालय यांनी आपले मनोगत व्यक्त केले. नूरसिंग जाधव मुख्य समन्वयक यांनी मान्यवरांचे व संस्थेचे कौतुक करणारे आपले मनोगत मांडले. संस्थेचे विश्वस्थ व कार्यक्रमाचे अध्यक्ष द्वारकादासजी दरक यानी अध्यक्षीय भाषण केले.कार्यक्रमाचे सूत्र संचालन मंदा तरंगे यांनी केले, ज्ञानमंदिरम विभागातील पारितोषिक वितरण कार्यक्रमाचे संचालन अपर्णा माकोडे यांनी केले तर १० वी बोर्ड परीक्षेच्या पारितोषिक वितरण कार्यक्रमाचे संचालन वैशाली भोयर यांनी केले तर कनिष्ट महाविद्यालयाच्या पारितोषिक वितरण कार्यक्रमाचे संचालन मंदा तरंगे यांनी केले व उपस्थतीत मान्यवरांचे आभार नम्रता इंगळे यांनी मानले. कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विध्यार्थी, शिक्षक, शिक्षिका, कर्मचारी व शहरातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचा शेवट कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी गायीलेल्या राष्ट्रगीताने करण्यात आला.



# आनंद अंध विद्यालयात लुई ब्रेल जयंती निमित्त विविध स्पर्धा संपन्न

**आनंदवन | प्रतिनिधी**

येथील आनंद अंध विद्यालयात लुई ब्रेल यांच्या जयंती निमित्त शालेय स्नेहसंमेलनात विविध स्पर्धा नुकत्याच संपन्न झाल्यात. आपण अनेक थोर पुरुषांच्या जयंत्या व पुण्यतिथी साजऱ्या करतो पण त्या महापुरुषांचा इतिहास सर्व सामान्यांपर्यंत कधीच पोहचत नाही. अंधांना लिपीचे माध्यम ठरलेल्या लुई ब्रेल यांची माहिती सर्वांपर्यंत गेली पाहिजे म्हणून याचा तसा प्रसार शासन स्तरावर होणे आवश्यक आहे असे प्रतिपादन महारोगी सेवा समितीचे विश्वस्त सुधाकर कडू यांनी केले. आनंद अंध विद्यालय आनंदवनात' लुई ब्रेल जयंती' मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली त्याप्रसंगी ते बोलत होते.

ब्रेल लिपीचे जनक, कर्णबधिरांचे प्रेरणास्थान डॉ. हेलन केलर व आनंदवन निर्मितीचे शिल्पकार श्रध्देय बाबा आमटे व साधनाताई यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून वरोरा पंचायत समितीचे शिक्षण विस्तार अधिकारी नामदेव राऊत यांनी उद्घाटन केले. या कार्यक्रमात अनिकेत धोसले व लक्ष्मण निकोडे या दोन्ही अंध विद्यार्थ्यांनी प्रमुख पाहुण्यांसमोर आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाची सुरुवात संगीत शिक्षिका माला भर व त्यांची अंध विद्यार्थी चमूंनी स्वागत गीताने केली. त्यात त्यांनी लुई ब्रेल यांच्या जीवनावर स्वरबध्द केलेले 'हॅपी बर्थ डे टू यू लुई ब्रेल, है जनम दिन लुई ब्रेल जी का, हम गीत इन्ही के गाते है' हे गीत गायले. या कार्यक्रमात शाळेच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रा- च्या विविध परंपरेनुसार जणू काही दिवाळी सुरु झाली की काय असा संपूर्ण प्रार्थना सभागृह आकाश कंदिलांनी व विविध रंगीत पताकांनी सजविले गेले होते. त्यांनी आम्ही अंध नाहित् हे त्यांच्या सजविलेल्या कलाकौशल्यातून दिसत होते. या तीन दिवस चाललेल्या स्पर्धेमध्ये सर्व प्रथम ब्रेल लिपी लेखन-वाचन स्पर्धा, मंगीत खुर्ची स्पर्धा, लीन पायांची स्पर्धा, लिंबू चमचा स्पर्धा, बुक बॅलेन्स स्पर्धा, फुगा फोडणे, पोत्यात होन्ही पाय टाकुन चालणे, कौन बनेगा करोडपत्तीच्या धरती- वर प्रश्नमंजुषा स्पर्धा, स्वयंशासन स्पर्धा, घेण्यात आल्या. लोकसंस्कृतीच्या विविध आदिवासींगोंडी गाण्यांवर सर्व विद्यार्थी व शिक्षक मंडळीनी ताल धरत सामुहिकपणे खुल्या हिरवळीवर मनसोक्त पणे नृत्य केले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी नामदेव राऊत, संधी निकेतन चे अधिक्षक रविंद्र नलगंटीवार , कर्णबधिर विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय भसारकर तर महारोगी सेवा समितीचे विश्वस्त सुधाकर कडू यांनी अध्यक्षपद भूषविले होते. या कार्यक्रमासाठी शुभ संदेशाचे वाचन परमानंद तिराणिक योनी केले, या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंध विद्यालयाचे मुख्याध्यापक सेवकराम बांगडकर यांनी केले. ते म्हणाले सामान्य भाषेसोबत ब्रेल लिपी शिकणे किती आवश्यक आहे याचे महत्व त्यांनी सांगीतले. या कार्यक्रमाचे संचालन परमानंद तिराणिक यांनी केले तर आभार प्रदर्शन वर्षा उईके यांनी केले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी क्रीडा समिती प्रमुख साधना ठक हस्तकला शिक्षिका, कृष्णा डोंगरवार, तनुजा सव्वाशेरे, विशेष तंत्रस्नेही शिक्षक विलास कावणपूरे, विशेष शिक्षिका वर्षा उईके, सांस्कृतिक विभाग प्रमुख परमानंद तिराषिक, चेतन चिंचोलकर, सतवन सरीयाम, रविंद्र चुदरी, अशोक गायधने, संजय पेचे, माला भट संगीत शिष्दीका, रमेश पप्पुलवार, नाना रोटके, गिता ठवरे यांनी सहकार्य केले,




# ना दुष्काळाची मदत, ना अवकाळीची भरपाई; राज्यातील ५१ लाख शेतकरी प्रतीक्षेत

**सोलापूर :** राज्यातील ४० तालुक्यांसह १२२८ महसूल मंडळांमध्ये दुष्काळ जाहीर झाला आहे. केंद्रीय पथकाने पाहणी करून आता महिना होतोय, तरीदेखील राज्यभरातील ४२ लाख शेतकऱ्यांना दुष्काळी मदत मिळालेली नाही. दुसरीकडे राज्यातील नऊ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना अवकाळीचा दणका बसला.त्यांना शासनाने दुप्पट मदत देण्याचा निर्णय घेतला, पण अद्याप दमडीही मिळालेली नाही. दूध अनुदानाचीही प्रतीक्षा असून गतवर्षीचे कांदा अनुदानही शेतकऱ्यांना मिळालेले नाही हे विशेष. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर धरणांनी तळ गाठला असून जमिनीची पाणीपातळी देखील एक मीटरने खाली गेली आहे.नुकसानीचा फटका सहन केलेल्या शेतकऱ्यांना सरकारकडून अद्याप दुष्काळ, अवकाळीची मदत मिळालेली नाही. दुसरीकडे दूध दराचे भाव कमी झाले असून कांदा निर्यातबंदीमुळे कांद्यालाही समाधानकारक भाव मिळत नाही.पीकविम्याचा २५ टक्के अग्रिम अजूनपर्यंत बहुतेक शेतकऱ्यांना मिळू शकलेला नाही. राज्यातील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय पथकाने नुकसानीची पाहणी केली. तत्पूर्वी, राज्य सरकारने केंद्राकडे मदतीचा प्रस्तावही पाठविला.मात्र, ना राज्य सरकारकडून ना केंद्राकडून शेतकऱ्यांना मदत मिळाली. अवकाळीने राज्यातील चार लाखांहून अधिक हेक्टरवरील पिके वाया गेली. त्याचीही मदत अजून मिळालेली नाही. शेतकरी आत्महत्या वाढलेल्या असतानाही राज्य सरकारकडून नुसत्याच घोषणा केल्या जात आहेत.सरकारकडून बळिराजाला कधीपर्यंत मदत मिळेल, यावर अधिकारीही स्पष्टपणे सांगू शकत नाही अशी वस्तुस्थिती आहे. दरम्यान, राज्यात २०२२ मध्ये दोन हजार ९४२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे. आता २०२३ मध्ये दोन हजार ८००पर्यंत शेतकऱ्यांनी जगाचा निरोप घेतला आहे.

# चंद्रपूर महानगरपालिकेच्या मलनि:स्सारण प्रकल्पास ५४२ कोटींची प्रशासकीय मान्यता

## ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे फलित

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

केंद्रशासन पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत चंद्रपूर महानगरपालिकेच्या रु. ५४२.०५ कोटीच्या मलनि:स्सारण प्रकल्पासाठी प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे हे फलित आहे. यासंदर्भातील शासन निर्णय नगर विकास विभागाने निर्गमित केला आहे.

केंद्र शासन पुरस्कृत २.० अभियानाची शासन निर्णयान्वये सन २०२१-२२ पासून राज्यामध्ये अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर अभियानांतर्गत पाणीपुरवठा सरोवरांचे पुनर्जीवन व हरित क्षेत्र विकास आदी पायाभूत सुविधांची निर्मिती राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये करण्यात येणार आहे. आणि यापूर्वीच्या अमृत अभियानांतर्गत समाविष्ट असलेल्या राज्यातील ४४ शहरांमध्ये मलनि:स्सारण सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत राज्याच्या १८२३६.३९ कोटी प्रकल्प किमतीच्या राज्य जलकृती आराखड्यास केंद्र शासनाने मान्यता दिलेली आहे. चंद्रपूर महानगरपालिकेच्या मलनि:स्सारण प्रकल्पांतर्गत कार्य सर्वेक्षण, मलनि:स्सारण प्रणाली, गृह सेवा कनेक्शन, रस्ता पुनर्रसंचयित करणे, रेल्वे क्रॉसिंग पुढे ढकलणे, राष्ट्रीय महामार्ग ९ आणि नाला क्रॉसिंग एकूण ७, पंपिंग मशिनरी, सीवरेज पंपिंग स्टेशन, सीवर स्वच्छता तपासणी आणि नूतनीकरण आदी कामे असणार आहे. सदर प्रकल्पाची अंमलबजावणी विहितकालावधीत पूर्ण करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणा, प्रकल्पव्यवस्थापन सल्लागार व प्रकल्प व्यवस्थापन विकास व व्यवस्थापन सल्लागार यांची संयुक्तरीत्या राहील. अमृत २.० अभियानांतर्गत मार्गदर्शक सूचनेनुसार सदर प्रकल्पासाठी प्रकल्प व्यवस्थापक सल्लागाराची नेमणूक करावी. केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियानाच्या केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या सर्व मार्गदर्शक सूचना चंद्रपूर महानगरपालिकेच्या मलनि:स्सारण प्रकल्पास लागू राहतील.



**शहरात २३३ किलोमिटरची पाईप लाईन**

**पहिल्या टप्प्यात चंद्रपूर शहरात २३३ किलोमिटर पाईप लाईन मलनि:सारण करण्यासाठी होणार असून यातून शहरातील ५४ हजार घरांना जोडणी होणार आहे.**

# लोकशाहीच्या रक्षणाकरिता पत्रकारांनी नीतिमत्ता जोपासून लेखणी झिजवावी-राजेंद्र मर्दाने



**वरोरा | प्रतिनिधी**

देशातील घटनात्मक संस्था कर्तव्य बजावताना दुजाभाव करत असल्याची उदाहरणे प्रकर्षाने उघडकीस येत आहेत आणि त्यामुळे सर्वसामान्य जनतेमध्ये असुरक्षितेची भावना पसरत असल्याने पत्रकारांनी नीतिमत्ता जोपासून लोकशाहीच्या संरक्षणासाठी आपली लेखणी झिजवावी, असे आवाहन राष्ट्रीय सामाजिक न्याय कृति मंचाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष तथा पत्रकार सुरक्षा समिती, चंद्रपूरचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मर्दाने यांनी येथे केले. पत्रकार सुरक्षा समिती, आनंदवन मित्र मंडळ, वरोरा व ओशनिक बहुउद्देशीय संस्था, वरोरा यांच्या संयुक्त विद्यमाने आनंदवन येथील स्वरानंदवन सभागृहात 'पत्रकार दिन ' साजरा करण्यात आला. त्यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महारोगी सेवा समिती, वरोराचे विश्वस्त सदाशिवराव ताजने हे होते.व्यासपीठावर सामाजिक कार्यकर्ता आसिफ रजा, पोद्दार स्कूलचे संचालक सचिन बुरीले, बोर्डा ग्राम पंचायत सदस्य उमेश देशमुख, आनंदवन मित्र मंडळ, वरोऱ्याचे अध्यक्ष डॉ. प्रवीण मुधोळकर, म.रा. मराठी पत्रकार संघ, वरोरा शाखा अध्यक्ष प्रवीण गंधारे, ओशनिक बहुउद्देशीय संस्थेचे संचालक राहुल देवडे आदी प्रामुख्याने उपस्थित होते.मर्दाने पुढे म्हणाले की, बाळशास्त्री जांभेकर यांची खरी जन्मतारीख २० फेब्रुवारी १८१२ आहे. ६ जानेवारी १८३२ रोजी त्यांनी ' दर्पण ' या आंग्लभाषीय वृत्तपत्राची सुरुवात मुंबई येथे करून मराठी वृत्तपत्राची ज्योत प्रज्वलित केली. मराठीतील पहिल्या ' दिग्दर्शन ' या मासिकाचेही ते संस्थापक संपादक होते. त्यांनी ' दर्पण ' मधून सामाजिक सुधारणेवर भर दिला.ते खऱ्या अर्थाने आद्य सुधारक,आद्य मराठी पत्रकार व आद्य प्राध्यापकही होते,असे त्यांनी नमूद केले.आज भांडवलदारांनी प्रिंट व इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर कब्जा केल्याने मोठया वर्तमानपत्रांच्या पत्रकारांना ,संपादकांना स्वतंत्रपणे लिखाण करण्यावर निर्बंध आहेत. मिंध्ये होऊन मालकाची जी हुजुरी करण्यापेक्षा बुद्धिवादी पत्रकारांनी स्वतःचे साप्ताहिक, पाक्षिक काढून लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी माध्यमांची स्वतंत्रता आणि निष्पक्षता टिकवून सत्तेच्या दुरुपयोगाला थांबविण्याचे आव्हान पेलावे , असे परखड मत त्यांनी व्यक्त केले.अध्यक्षीय भाषणात ताजने म्हणाले की, पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून समाजातील त्यांचे स्थान आदराचे असल्याने त्यांनी विश्वासार्हता जपणे अत्यंत आवश्यक आहे. पत्रकारांनी कोणत्याही राजकीय पक्षाची बांधीलकी न स्वीकारता जनसामान्यांचे प्रश्न पोटतिडकीने मांडून विकासाचे राजदूत व्हावे.यावेळी असिफ रजा यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.सुरुवातीला मान्यवरांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून विनम्र अभिवादन केले व दीप प्रज्वलन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. प्रवीण मुधोळकर यांनी केले. आभार राहुल देवडे यांनी मानले.कार्यक्रमात आनंदवनाचे कार्यकर्ते दीपक शीव, पत्रकार खेमचंद नेरकर, सामाजिक कार्यकर्ते किशोर देवडे, आकाश खातरकर, गजानन गायकवाड, रोशन बहादे आदींसह स्वरानंदवनातील कलाकार, महिला, गणमान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .